महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

सोमवार, दिनांक ३० मार्च, २०१५ / चैत्र ९, १९३७ (शके)

(१)	**वित्त आणि नियोजन, वने मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**
(२)	**ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल कल्याण मंत्री**	
(३)	**जलसंपदा मंत्री**	
(४)	**सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री**	

प्रश्नांची एकूण संख्या - ५१

मौजे घाटपुरी (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील अंगणवाडीत पुरक षोषण आहारात झालेला गैरव्यवहार

(१) * **४०४२ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटपुरी (ता.खामगांव जि.बुलढाणा) येथील अंगणवाडीत पुरक षोषण आहारात गैरव्यवहार, अफरातफर व शासनाची फसवणूक होत असल्याबाबत श्री.नारायण भिकाजी इंगळे व इतर ग्रामस्थांनी संबंधित सी.डी.पी.ओ. व प्रधान सचिव, महिला व बाल कल्याण मंत्रालय, मुंबई यांना दि.९ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे घाटपुरी येथील अंगणवाडीमध्ये सदर प्रकार २००९ पासून ते अद्यापपर्यन्त सुरू आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तक्रारी होऊन सुध्दा सी.डी.पी.ओ. यांनी संबंधितांशी संगनमत करुन चौकशी करण्यास विलंब केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा बुलढाणा येथे जि.प.मध्ये महिला व बाल विकास विभागात फार मोठया प्रमाणात शासनाची फसवणूक व दिशाभूल होत असल्याबाबत श्री. नारायण भिकाजी इंगळे यांनी प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचेकडे दि. ९ सप्टेंबर, २०१४ रोजी तक्रार केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) बाल विकास प्रकल्प अधिकारी नांदुरा व बाल विकास प्रकल्प अधिकारी खामगांव यांनी सादर केलल्या अहवालानुसार मौजे घाटपुरी, ता. खांमगाव जि.बुलढाणा येथील अंगणवाडी सेविकेला मानधनी पदावरुन कमी करण्यात आले आहे. तसेच सदर तक्रारीची चौकशी करण्यास विलंब केल्याबाबत बाल विकास प्रकल्प अधिकारी खामगांव यांना तसेच अफरातफर प्रकरणी दुर्लक्ष केल्याबाबत संबंधित पर्यवेकक्षिका यांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) जिल्हा परिषद, बुलढाणा यांनी कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. सदर नोटीसचा खुलासा प्राप्त होताच बाल विकास प्रकल्पे अधिकारी व संबंधित पर्यवेक्षिका यांचेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे लिंबारुई (ता.बीड) येथे मंजूर असलेले आरोग्य उपकेंद्र चुकीच्या माहिती आधारे इतरत्र मंजूर केल्याबाबत

(२) * ३६४७ श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लिंबारुई (ता.बीड) येथे मंजूर असलेले आरोग्य उपकेंद्र चुकीच्या माहिती आधारे बेकायदेशीररित्या इतरत्र मंजूर केल्याची तक्रार दिनांक २९ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनी आरोग्य संस्थांमधील चुकीचे अंतर दाखवून बृहत आराखड्यात मंजूर असलेले लिंबारुई आरोग्य उपकेंद्र इतर ठिकाणी प्रस्तावित केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००१ च्या लोकसंख्येवर आधारित बृहत आराखड्यातील मौजे लिंबारुई येथील आरोग्य उपकेंद्र इमारत बांधकाम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, चुकीची माहिती दिल्यामुळे इमारत बांधकामास झालेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांच्याविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) होय.

मा.लोकप्रतिनिधी यांनी दि.२९.१२.२०१४, दि.१२.०१.२०१५ व दि.२९.०१.२०१५ च्या पत्रान्वये मौजे लिंबारुई, जि.बीड येथील आरोग्य उपकेंद्राच्या नावात करण्यात येत असलेल्या बदलासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे तक्रार केली आहे.

(२) होय.

जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनी दि.८.०५.२०१३ च्या पत्रान्वये बृहत आराखड्यातील मंजूर असलेले बीड जिल्ह्यातील आरोग्य उपकेंद्र लिंबारुई ऐवजी सांडरवन येथे करण्याबाबत आरोग्य सेवा संचालनालयास कळविले आहे.

(३) सन २०१४-२०१५ या वर्षी उपकेंद्र लिंबारुई च्या बांधकामाकरिता राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत रु.१५.०० लक्ष इतके अनुदान उपलब्ध झाले आहे. सद्यःस्थितीत आरोग्य उपकेंद्र लिंबारुई येथील इमारतीचे बांधकाम सुरू झालेले नाही.

(४) प्रस्तूत प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील निराधार बालकांचे संगोपन करणाऱ्या बालसुधारगृहातील कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत

(३) * ३७७९ श्री.विजय गिरकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.शरद रणपिसे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.नागो गाणार, श्री.अनिल सोले, श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ५०६०२ ला दिनांक १२ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ९० हजार निराश्रित बालके असून त्यांच्यासाठी सद्यस्थितीत शासनाची तेहतीस आणि स्वयंसेवी संस्थांची १ हजार ७२ बालगृहे कार्यरत आहेत त्यापैकी सुमारे ७० बालगृहे अनियमिततेमुळे रद्द करण्यात आली असून सध्या फक्त १००० बालगृहे असून ती पुरेशी पडत नसल्याने राज्यातील सुमारे ९० हजार निराश्रित बालकांच्या पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्वयंसेवी संस्थांची बालगृहे कर्जात अडकल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच राज्यात १९९३ पासून शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावर स्वयंसेवी संस्थाकडून बालसदन, बालकाश्रम व अनाथालये चालविली जातात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील ९० टक्के अनाथाश्रम आदिवासी व ग्रामीण भागात असल्याने तेथील बालकांना उपासमारीला तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या अनुदानातूनच तेथील कर्मचाऱ्यांचे वेतन व इमारतीचे घरभाडे सुद्धा संस्था चालकांना द्यावे लागत आहे, हेही खरे आहे काय,

(६) असल्यास, प्रत्येक बालकास प्रतिमहा ६३० रुपये पोषण भत्ता मिळतो तर, बालकांना २४ तास सांभाळून काम करणाऱ्या १० हजार कर्मचाऱ्यांना वेतन मिळाले नसल्याचे दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(७) तसेच कर्मचाऱ्यांना अनुदान व वेतनेत्तर अनुदान मिळत नसल्याने त्यांना आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागते, हे ही खरे आहे काय,

(८) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(९) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) शासनाकडून देण्यात येणारे अनुदान हे सहाय्यक अनुदान म्हणून दिले जाते.

(४) हे खरे नाही.

(५), (६), (७) व (८) शासनाकडून देण्यात येणारे अनुदान हे सहाय्यक अनुदान म्हणून दिले जाते. स्वयंसेवी संस्थांची नोंदणी धर्मादाय आयुक्त यांचेकडे होत असल्याने त्यांना जनतेमधून तसेच, विविध सेवाभावी संस्थाकडून पैसा उभा करता येतो. किंबहुना स्वयंसेवी संस्थांनी शासन अनुदानाव्यतिरिक्त लागणारा पैसा स्वतः उभारणे अपेक्षित आहे. शासनाने, यापूर्वी देण्यात येत असलेल्या परिपोषण अनुदानामध्ये वाढ करण्याचा निर्णय यापूर्वीच शासन निर्णय दि. १३ सप्टेंबर, २०१३ अन्वये घेण्यात आला असून त्यानुसार सर्वसाधारण बालगृहांना दरमहा दरडोई रु. १२१५/- (आहार व परिपोषणावर रु, ९००/- व वेतन, इमारत भाडे व इतर प्रशासकीय खर्चावर रु.३१५/-) व विशेष काळजीची गरज असलेल्या बालकांकरीता रु. १३०५/- (आहार व पारिपोषणावर रु.९९०/- व वेतन, इमारत भाडे व इतर प्रशासकीय खर्चावर रु.३१५/- दरमहा दरडोई) इतके सहाय्यक अनुदान काही अटींच्या अधिन राहून मंजूर करण्यात आले आहे.

(९) प्रश्न उद्भवत नाही.

पेण तालुक्यातील (जि.रायगड) हेटवणे मध्यम प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्याबाबत

(४) * **४१४४ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण तालुक्यातील (जि.रायगड) हेटवणे मध्यम प्रकल्पातील पाण्याच्या विसर्गासाठी आणलेले पाईप गेली नऊ वर्षे वापराविना तसेच पडून असून त्यातील काही पाईप शेतकऱ्यांच्या जमिनी भाडेपट्टयाने घेऊन तेथे ठेवले असून ठेकेदाराने त्याचे भाडे थकविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त प्रकल्पाचे काम अनेक वर्षे होऊनही पूर्णत्वास गेलेले नसल्याने उक्त तालुक्यातील ५२ गावे या प्रकल्पाच्या पाण्यापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी पाईप ठेवण्यासाठी ज्यांच्या जागा भाडेपट्टयावर घेतल्या आहेत त्या जागेचे भाडे अदा करणे तसेच उक्त प्रकल्प त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, साधारणत: केव्हापर्यंत उक्त प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय.

(२) होय.

(३), (४) व (५) ठेकेदारामार्फत पाईप ठेवण्यासाठी शेतक-यांच्या जमिनी भाडे तत्वावर घेण्यात आल्या आहेत त्या शेतक-यांची थकित भाडे त्वरीत अदा करणेबाबत क्षेत्रीय कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे. तसेच शेतक-यांचा विरोधामुळे वेळेत संयुक्त मोजणी न झाल्यामुळे कोप्रोली, शिर्की वितरीका व वाशी उपवितरीकेच्या कामाचे भुसंपादन प्रस्ताव व्यपगत झाले आहेत. सदर प्रस्ताव नविन भुसंपादन कायद्यानुसार तयार करुन भुसंपादन प्रक्रिया पुर्ण झाल्यावर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प पुर्ण करावयाचे नियोजन आहे.

ठाणे जिल्हयातील कुपोषणावर नियंत्रण करण्याबाबत

(५) * ४०६४ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ९३५ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेकडून कुपोषित बालकांना नियमित उपचार व वेळेवर आहार मिळावा याकडे लक्ष ठेवण्यासाठी भिवंडी तालुक्यात १२५ पर्यवेक्षिकांची नव्याने नेमणूक केली असून, ग्रामीण अंगणवाडीत एकूण ४१ हजार ३७७ बालके आहेत, त्यापैकी डिसेंबर, २०१४ अखेर भिवंडी तालुक्यात ८६९ कुपोषित बालके आढळली असून, त्यातील १४७ बालकांची प्रकृती गंभीर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बालकांमध्ये कुपोषण वाढू नये म्हणून शासन प्रयत्नशील असले तरी कर्मचारी व अंगणवाडी परिवेक्षिका यांच्या कामचूकारपणामुळेच भिवंडी तालुक्यातील बालकांमध्ये कुपोषण वाढत असल्याचे वार्षिक अहवालावरुन दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच बालविकासाच्या व आरोग्याच्या अनेक योजना राबवुनही राज्यात ठाणे, पालघर, नंदुरबार या जिल्हयातील आदिवासी पट्टयात बालमृत्यूंचे प्रमाण ४० टक्क्यांपर्यंत आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या भागातील गरोदर माता व बालकांची नियमित तपासणी करुन त्यांच्यावर देखरेख ठेवल्याबाबतचा दावा यंत्रणांकडून करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने कुपोषणावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती तातडीची उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, याप्रकरणी संबंधीत दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

भिवंडी तालुक्यात भिवंडी-१ व भिवंडी-२ असे दोन प्रकल्प येत असून सदर प्रकल्पांतर्गत १४ पर्यवेक्षिकांची पदे मंजूर असून त्यापैकी १२ पदे कार्यरत आहे.

मासिक प्रगती अहवालानुसार भिवंडी-१ व भिवंडी-२ प्रकल्पामधील माहे **डिसेंबर, २०१३** व माहे **डिसेंबर, २०१४** च्या कुपोषणाची तुलनात्मक स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

प्रकल्प	माहे / वर्षे	एकुण वजन घेतलेल्या बालकांची संख्या	सर्वसाधारण बालके	मध्यम कमी वजनाची बालके	तीव्र कमी वजनाची बालके
भिवंडी-१	डिसेंबर, २०१३	२५७१७	२४८९९	७३१	८७ (०.३३)
	डिसेंबर, २०१४	२५१०७	२४५८८	४६२	५७ (०.२२)
भिवंडी-२	डिसेंबर, २०१३	१६८६३	१५२८५	१२८२	२८६ (१.६९)
	डिसेंबर, २०१४	१७००३	१४७८०	१७२६	४९७ (२.९२)

(२) हे खरे नाही.

अंगणवाडी पर्यवेक्षिकेकडून अंगणवाडी स्तरावर कुपोषण निर्मुलनासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या सेवा पुरविण्याबाबत सातत्याने प्रयत्न करुन कुपोषित मुलांचे श्रेणीवर्धन करण्याचा प्रयत्न केला जातो.

(३) **माहे एप्रिल, २०१४ ते जानेवारी, २०१५** या कालावधीत **ठाणे, पालघर व नंदुरबार** जिल्हयातील बालमृत्यूबाबतची आकडेवारी पुढीलप्रमाणे आहे.

जिल्हा	एकूण जन्म	०-१ वर्षे (अर्भक मृत्यू)	१-६ वर्षे (बाल मृत्यू)	०-६ वर्षे (एकूण मृत्यू)
ठाणे	६४९६	१४९	४५	१९४
पालघर	१६६५५	२९५	१२३	४१८
नंदुरबार	२६०९५	४०३	२५९	६६२

(४) हे खरे आहे.

(५) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तथापि कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१. दोन बाळंतपणामधील अंतर वाढविणे, दोन अपत्यापर्यंत पाळणा थांबविणे या गुणात्मक दर्शकांच्या पूर्ततेवर भर दिला जातो.

२. गरोदर मातेची १६ आठवडयाच्या आत नोंदणी करुन धनुर्वात प्रतिबंधक लस, फेरस सल्फेटच्या १०० गोळया तीन महिन्यांसाठी दिल्या जातात.

३. जोखमींच्या मातांसाठी विशेष सेवा म्हणून हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असलेल्या मातांना फेरस सल्फेटच्या गोळया उपचारात्मक मात्रा दिल्या जातात व अशा मातांना प्रसुती पूर्व, प्रसुती अंतर्गत व प्रसुती पश्चात ४२ दिवसांपर्यंत गुंतागुत उदभवू नये म्हणून मानव विकास कार्यक्रमांतर्गत त्यांची स्त्रीरोगतज्ञांकडून तपासणी व औषध उपचार करण्यात येतो.

४. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत गरोदर मातांना प्रसुतीसाठी घरुन दवाखान्यात आणले जाते. सुरक्षित प्रसुतीनंतर घरी सोडले जाते व सदर कालावधीत त्यांना आहार देखील दिला जातो.

५. प्रसुतीनंतर बाळाचे वजन घेऊन नवजात बालकांची विशेष काळजी घेतली जाते.

६. सॅम व मॅम मधील बालकांची दरमहा वैद्यकीय तपासणी केली जाते. तसे ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना वर्षातून दोन वेळा अ जीवनसत्व व जंतनाशक औषधी दिली जातात.

७. अंगणवाडीमधील सर्व बालकांचे वेळापत्रकानुसार लसीकरण करण्यात येते.

८. कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने ग्राम बाल विकास केंद्र व बाल उपचार केंद्र घेण्यात येतात.

९. दुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात येत असून या शिबीरांमध्ये जोखमीच्या गरोदर मातांची स्त्रीरोगतज्ञांमार्फत तपासणी करुन आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देण्यात येते. सर्व गरोदर स्त्रिया, स्तनदा माता तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची तज्ञामार्फत तपासणी करुन औषधोपचार करण्यात येते.

(६) व (७) प्रश्न उद्भवत नाही.

ममदापुर (ता.येवला, जि.नाशिक) येथे साठवण तलाव
योजनेच्या प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत

(६) * **३४८१ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ममदापुर (ता.येवला, जि.नाशिक) येथे साठवण तलाव योजनेचा प्रस्ताव सचिव समितीच्या मान्यतेसाठी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येवला तालुक्यातील पुर्व भागातील टंचाईग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी सदर प्रस्तावास मंजुरी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.
(२) सदर प्रस्तावाची तपासणी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी करणेबाबत

(७) * **२८६६ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, ॲड.अनिल परब, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.प्रकाश बिनसाळे :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घरगुती हिसांचार प्रकरणात महिलांच्या सुरक्षेसाठी घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा करून बराच कालावधी उलटून गेल्यानंतरही या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत पिडित महिलांना मदत करण्यासाठी पूर्णवेळ सुरक्षा अधिकारी नेमण्यात न आल्याप्रकरणी उच्च न्यायालयाने राज्य शासनाला निर्देश देवूनही अद्यापही या प्रकरणी शासनाने उचित कार्यवाही न केल्याने पिडित महिलांची गैरसोय होत असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच या कायद्यातील तरतुदीनुसार राज्यातील प्रत्येक तालुका पातळीवर पूर्णवेळ सुरक्षा अधिकारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही, घरगुती हिंसाचार प्रकरणात महिलांच्या सुरक्षतेसाठी घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायद्याची प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे.

(२) व (३) शासन निर्णय क्र. मबाआ-२०११/प्र.क्र.१७३/का-७, दि. १५.०२.२०१२ अन्वये जिल्हास्तरावर पूर्णवेळ संरक्षण अधिकारी उपलब्ध करुन देण्यासाठी ३७ संरक्षण अधिका-यांची पदे निर्माण केली. त्यापैकी २९ संरक्षण अधिकारी कर्तव्यावर रुजू झाले आहेत.

शासन निर्णय क्र. मबावि-२०११/प्र.क्र.१७३/का-७ (भाग-२), दि. १४.०७.२०१४ व दि. २९.०१.२०१५ अन्वये अनुक्रमे २१६ व १४२ संरक्षण अधिका-यांची पदे निर्माण करण्यात आली आहेत. यानुसार प्रत्येक तालुक्यासाठी पदे निर्माण करण्यात आली आहेत. नियमानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील महिला आर्थिक विकास मंडळातील अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(८) * ३६९८ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणाऱ्या महिला आर्थिक विकास मंडळाची अवस्था अतिशय बिकट झाली असून मागील तीन वर्षापासून अध्यक्ष आणि सहा महिन्यांपासून व्यवस्थापकीय संचालक पद रिक्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरची दोन्ही पदे तातडीने भरून सदर मंडळाचा कारभार सुरळीत चालावा म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) (२) (३) महिला आर्थिक विकास महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी भारतीय प्रशासन सेवेतील (भा.प्र.से.) अधिका-याची नियुक्ती शासनाकडून करण्यात आली आहे. तथापि सदयःस्थितीत व्यवस्थापकीय संचालक हे वैद्यकीय रजेवर असल्याने सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार महाव्यवस्थापक (प्रकल्प) महिला आर्थिक विकास महामंडळ यांचेकडे सोपविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पेण (जि.रायगड) तालुक्यातील हजारो एकर भातशेती नापीक होऊन पडीक झाल्याबाबत

(९) * ३८७८ श्री.जयंत पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेण (जि.रायगड) तालुक्यातील जमीन अनेक ठिकाणी अगोदरच फुटलेल्या खारबंदीस्तीच्या बांधातून उधाणाचे खारे पाणी दिनांक २७ डिसेंबर २०१४ रोजी वा त्यासुमारास शेतीत घुसल्याने दादर, भाल, कोप्रोली इत्यादी भागातील हजारो एकर भातशेती नापिक होऊन पडीक झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारबंदीस्तीची कामे करोडो रुपये खर्च करुन देखील व्यवस्थित होत नसल्याने शेतकरी वर्गात नाराजी पसरल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भातशेतीचे नुकसान होणार नाही याबाबत कायमस्वरुपी पर्याय शोधून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) हे अंशत: खरे आहे.

माहे जानेवारी व फेब्रुवारी २०१५ मध्ये झालेल्या मोठया उधानामुळे नारवेल बेनवले खारभूमी योजनेतील भाल या गावाच्या भागाला पडलेल्या खांडींची दुरुस्ती उपलब्ध असलेल्या देखभाल व दुरुस्ती निधीतून व स्थानिक लाभार्थ्यांच्या सहकार्याने करुन लाभक्षेत्र नापिक होणार नाही, याची खबरदारी घेण्यात आली आहे.

तथापि, दादर, कोप्रोली या खाजगी योजना असल्यामुळे त्यांच्या दुरुस्तीची कामे शासनामार्फत केली जात नाहीत.

(२) नाही.

खारभूमी योजनेच्या देखभाल व दुरुस्ती करीता उपलब्ध निधीतून देखभाल व दुरुस्तीची कामे करुन क्षेत्र नापीक होणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.

(३) नाबार्ड १६, १७ व १९ अर्थसहाय्यांतर्गत योजनांची नुतनीकरणाची कामे हाती घेऊन कमकुवत झालेल्या योजनांचे मजबुतीकरण तसेच उघाडयांची नवीन बांधकामे करण्यात येत आहेत. तसेच, नारवेल बेनवले ही खारभूमी योजना राष्ट्रीय चक्रीवादळ आपत्ती निवारण प्रकल्पांतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राळेगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) आदिवासी बहुल जळका-वरणा रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(१०) * ३४४९ श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव तालुक्यातील (जि.यवतमाळ) आदिवासी बहुल जळका-वरणा रस्त्याच्या कामावर पाच वर्षात कागदोपत्री पंधरा लाख रुपये खर्च केले आहेत, मात्र कुठल्याच रस्त्याचे काम करण्यात आले नसल्याचे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रस्त्याचे काम न करता १५ लाख रूपये खर्च करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती विभागातील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कला/क्रीडा महोत्सवासाठी रक्कम कपात केल्याबाबत

(११) * **३३८१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कला/क्रीडा महोत्सवासाठी वेतन देयकातून रक्कम कपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यक्रमासाठी शासनाने खर्चाची तरतूद न करता कर्मचाऱ्यांच्या वेतन देयकातून रक्कम कपात करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अमरावती जिल्हा परिषदेमधील जिल्हा परिषद कर्मचा-यांच्या वेतनातून कला/क्रिडा महोत्सवासाठी वर्गवारीनुसार वेतन देयकातून वर्गणी म्हणून रक्कम कपात करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शालेय स्तरावर क्रिडा स्पर्धेत जखमी स्पर्धकावर उपचार करण्याबाबत

(१२) * **३०४७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जिल्हा परिषदांमार्फत शालेय स्तरावर विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जात असून यात काही स्पर्धक जखमी होत असून योग्य उपचार होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी जखमी स्पर्धकावर येणारा औषध व दवाखान्याचा खर्च जिल्हा परिषदेने द्यावा, अन्यथा या स्पर्धाच बंद कराव्यात अशी मागणी जिल्हा सदस्यांनी केली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) अद्याप कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) राज्यात जिल्हा परिषदे अंतर्गत शालेय स्तरावर विविध क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते.

सदर क्रिडा स्पर्धांमध्ये जखमी झालेल्या स्पर्धकांना स्पर्धेच्या ठिकाणी तसेच नजीकच्या शासकीय रुग्णालयामध्ये दाखल करुन योग्य उपचार करुन घेतला जातो.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांव, येवला (जि.नाशिक) तालुक्यात इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुल तसेच विहीर वाटपात झालेला गैरव्यवहार

(१३) * **२८११ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव तसेच येवला (जि.नाशिक) तालुक्यात घरकुल व विहीर वाटपात संबंधीत ग्रामपंचायत व ग्रामसेवकाने गैरव्यवहार केल्याप्रकरणी त्यांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास संबंधीत तालुक्याच्या गटविकास अधिकारी यांचेकडे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इंदिरा आवास योजनेतील घरकुले श्रीमंतांना दिल्याचा तसेच विहीर वाटप लाभार्थ्यांच्या यादीत पक्षपातीपणा झाल्याचा आरोपही करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, वरील चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, वरील प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे. तथापि, अशी मागणी केवळ गट विकास अधिकारी, येवला यांचेकडे प्राप्त झाली आहे. गट विकास अधिकारी, नांदगांव यांचेकडे अशी मागणी प्राप्त झालेली नाही.

(२) होय.

(३) होय.

(४) चौकशीमध्ये गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुवर्ण जयंती ग्रामरोजगार योजना व एमएसआरएलएम अंतर्गत स्वयंरोजगार मालवस्तू विक्री केंद्र बांधण्याबाबत

(१४) * **३७३० श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात प्रत्येक तालुक्यात सुवर्ण जयंती ग्रामरोजगार योजना व एमएसआरएलएम अंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गट स्वंयरोजगार मालवस्तू विक्री केंद्र बांधण्यात आली आहेत तथापी ती वापराविना पडून आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच ती विक्री केंद्रे वापरात आणणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशतः होय.

(२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना/महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता बचत गट व स्वरोजगारीसाठी कायमस्वरुपी तालुका विक्री केंद्र बांधण्यात आली आहेत. सदर तालुका विक्री केंद्राची स्थापत्य कामे पूर्ण झाली आहेत. त्यापैकी एका तालुका विक्री केंद्राचे काम पूर्ण झाले असून सदर विक्री केंद्र बचत गटांना वापरण्यास देण्याबाबतची कार्यवाही गट विकास अधिकारी माढा यांचेमार्फत सुरु आहे. उर्वरित ४ तालुका विक्री केंद्राचे विद्युतीकरण व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची पंचतारांकित हॉटेलमध्ये परिषद भरवून लाखो रुपयांची केलेली उधळपट्टी

(१५) * **३०९० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.जयवंतराव जाधव, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.ग्रामविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील जिल्हा परीषदांच्या योजनांवर सखोल चर्चा करण्यासाठी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तीन दिवसांची परिषद मुंबईतील ॲम्बॅसेडर या पंचतारांकित हॉटेलमध्ये दिनांक १२ जानेवारी, २०१५ पासून संपन्न झाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयात वा सह्याद्री अतिथीगृह वा अन्य शासकीय सभागृहात अशी बैठक घेण्याऐवजी ॲम्बॅसेडर या पंचतारांकित हॉटेलमध्ये बैठक घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच राज्याच्या तिजोरीत निधी कमी असताना आणि प्रशासकीय उधळपट्टीला निर्बंध घालण्याचे प्रयत्न सुरु असून त्यासाठी विकास कामांच्या खर्चावर ४० टक्क्यांने कात्री लावण्यात आलेली असून, हा कर आणखी वाढण्याची शक्यता असताना मा.मुख्यमंत्र्यांच्या आदेशाचे उल्लंघन करुन अशा प्रकारे पंचतारांकित हॉटेलमध्ये परिषद घेतल्याने एकूण किती रक्कम खर्च झालेली आहे,

(४) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी आपल्या सहकारी मंत्र्यांना दिलेल्या काटकसरीच्या सल्ल्याचे जाणीवपूर्वक उल्लंघन याप्रकरणी झालेले असल्याने शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांची दि.१२ व १३ जानेवारी, २०१५ या दोन दिवसांची कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेचे उदघाटन मा.मंत्री, ग्रामविकास यांनी केले असून मा. राज्यमंत्री ग्रामविकास हे कार्यशाळेचे अध्यक्ष होते.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची कार्यशाळा हॉटेल ॲम्बॅसेडर येथे घेण्याची सर्वसाधारण कारणे खालीलप्रमाणे आहेत-

१) सह्याद्री अतिथीगृह हे राज्य अतिथीगृह असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राज्य अतिथीचा दर्जा अनुज्ञेय नाही.

२) सदर कार्यशाळा दोन संपूर्ण दिवसभराच्या भरगच्च कार्यक्रमाची असल्याने वेळ वाचविण्यासाठी ५० अधिका-यांची राहण्याची व्यवस्था दक्षित मुंबईत करणे आवश्यक होते.

३) सदर कार्य शाळेकरीता निवास, रात्रीचे जेवण व सकाळचा नाष्ता यांच्या खर्चाची व्यवस्था युनिसेफने केलेली असून हॉटेल ॲम्बेसेडर हे युनिसेफच्या पॅनेलवर असल्याने त्या हॉटेलची शिफारस युनिसेफने केलेली होती.

४) कार्यशाळेचे स्थळ मंत्रालयाजवळ घेतल्याने मंत्रालयातील सार्वजनिक आरोग्य विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, जलसंधारण व रोजगार हमी विभाग, वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाच्या सचिव स्तरावरील अधिका-यांना उपस्थित राहून सहभाग घेता आला व त्याच्या विभागांचा आढावा घेता आला.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या झालेल्या कार्यशाळेसाठीच्या निवासाचा, रात्रीच्या भोजनाचा, सकाळच्या नाष्टयाचा खर्च युनिसेफ यांनी केलेला आहे. कार्यशाळेदरम्यान दिवसाच्या अल्प भोजन व चहापनाचा खर्च केंद्र शासनाच्या राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांतर्गत प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या निधीतून करण्यात आलेला आहे. एकूण खर्च रु. २.२० लक्ष झाला आहे.

(४) व (५) राज्य शासनाच्या निधीतून खर्च झाला नसल्याने प्रश्न उद्भवत नाही.

गडचिरोली वन विभागातील साहित्य खरेदीत मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याबाबत

(१६) * **२९५७ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली वन वृत्त अंतर्गत अगरबत्ती प्रकल्प सुरू करण्याकरीता साहित्य खरेदी करतांना मोठ्या प्रमाणात अनियमितता होवून त्यात गैरप्रकार झाल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोप खरेदी व वन विभागातील साहित्य खरेदी यातही मोठ्या प्रमाणात गैरप्रकार झाल्याचे भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन अहेरी तालुका निमंत्रक व मानवाधिकार संघटनेचे विभागीय अध्यक्ष यांनी लेखी तक्रार मा.वनमंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय व दोषी वन अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील जवाहर धडक सिंचन योजनेंतर्गत विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत

(१७) * **३३१२ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात शासनाने सन २००४-०५ मध्ये सुरु केलेली जवाहर धडक सिंचन योजना अद्यापही रखडली असून जिल्ह्याला १४ हजार ८४५ विहिरींना शासनाने मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ५ वर्ष उलटून गेल्यानंतर केवळ ६ हजार ११६ विहिरीचे काम पूर्ण झाली असून १९३५ विहिरींची कामे अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कामे पूर्ण झालेल्या ३ हजार २१८ विहिरींचे अनुदान शेतकऱ्यांना अद्यापही प्राप्त झाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अद्यापपर्यंत विहिरींचे काम पूर्ण न होण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, काम पूर्ण झालेल्या विहिरींचे अनुदान शेतकऱ्यांना प्राप्त करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) सन २००८-०९ मध्ये धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत यवतमाळ जिल्ह्यात १४,८४५ विहीरी मंजूर करण्यात आल्या असून त्यापैकी ७०९७ विहीरी पूर्ण झाल्या आहेत आणि ६४२४ विहिरीची कामे प्रगतीपथावर आहेत.
(३) धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत विहीरीसाठी शासनाने रु. ३६१२.३९ लक्ष इतका निधी फेब्रुवारी, २०१५ मध्ये मंजूर केला असून त्यापैकी विहीरीच्या मुल्यांकनानुसार लाभार्थ्यांना रु. १५५.२० लक्ष इतका निधी वाटप करण्यात आला आहे. उर्वरित निधीच्या वाटपाची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु आहे.
(४) व (५) धडक सिंचन विहीरीची कामे शेतकरी स्वतः करत असल्यामुळे शेतीची मशागतीचे काम व तदनंतर आलेला पाऊस यामुळे कामे अपूर्ण आहेत. तथापि, आता शासन / विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी स्तरावरून विहीरीची कामे पूर्ण करण्याबाबत आढावा बैठका घेण्यात आल्या आहेत. विहीरी पूर्ण करण्यास येणा-या अडचणी विचारात घेवून शासनस्तरावरुन सुधारीत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच शासन परिपत्रक दिनांक २२.१२.२०१४ अन्वये विहीरीची कामे पूर्ण करण्यास दिनांक ३०.६.२०१५ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आली आहे. तदनुसार कार्यवाही सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा परिषद परभणी मधील उपअभियंत्याच्या बोगस कामांची मुद्देनिहाय चौकशी करण्याबाबत करावयाची कार्यवाही

(१८) * २७८६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या जिंतुर उप विभागातील उपअभियंता श्री सामाले यांनी केलेल्या सुमारे ५० कोटी रुपयांच्या बोगस कामांची मुद्दे निहाय चौकशी करण्याबाबत परभणी येथील सामाजिक कार्यत्यांनी जिल्हाधिकारी परभणी यांच्याकडे मुद्दे निहाय लेखी तक्रार नोंदविली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिका-यांच्या पत्राप्रमाणे जिल्हा परिषद स्तरावरुन सविस्तर चौकशी सुरु करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, या मुद्देनिहाय तक्रार व चौकशीत काय निष्पन्न झाले, तसेच दोषी अधिकारी व यंत्रणावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, दोषींना पाठीशी घालण्याचे धोरण राबविण्यात येत आहे काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) होय.

(३) चौकशी अंती श्री.सामाले यांच्या कार्यकाळातील बांधकामे समाधानकारक असल्याचे आढळून आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

औरंगाबाद विभागामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(१९) * ४५५४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत जननी सुरक्षा योजना, जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम, बाल आरोग्य कार्यक्रम, ग्राम बालविकास केंद्र, शालेय आरोग्य तपासणी आदी योजना राबविल्या जात असतानाही औरंगाबाद विभागांतर्गत औरंगाबादसह अन्य जिल्ह्यासाठी मागील ३ महिन्यांपासून वारंवार मागणी करुनही निधी मिळत नसल्याने हे अभियान रखडले असून या अभियानांतर्गत काम करणा-या सुमारे ५०० कर्मचा-यांचे वेतनही मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू राष्ट्रीय आरोग्य अभियानास पूर्वी केंद्र शासनाकडून थेट निधी मिळत होता, तथापि सन २०१४-२०१५ पासून हा निधी कोषागार विभागाकडून वळविण्यात आल्यामुळे निधी मिळण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औरंगाबाद विभागामध्ये औरंगाबाद, जालना, परभणी व हिंगोली या जिल्ह्यासाठी मंजूर असणा-या ८० कोटी रुपयांपैकी फक्त २४ कोटी रुपयेच प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, निधी नसल्यामुळे ग्रामीण भागातील गरोदर महिलांना प्रसुतीनंतर देण्यात येणारे अनुदान दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, रुग्णालयात प्रसुती होण्यासाठी हे प्रोत्साहनपर अनुदान न दिल्याने त्या भागात बाल मृत्युमध्ये वाढ झाली असून गरोदर महिलांच्या आरोग्यावर दुष्परीणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी औरंगाबादसह अन्य सर्व जिल्ह्यांसाठी राज्य आरोग्य सोसायटीकडील उपलब्ध निधीतून पुरेसा निधी वितरीत करण्यात आला असून फेब्रुवारी २०१५ पर्यंतचे सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यासाठी आवश्यक अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात औरंगाबाद परिमंडळातील औरंगाबाद, जालना, हिंगोली व परभणी या चारही जिल्ह्यांत एकूण मंजूर रुपये ८५ कोटी पैकी रुपये ६०.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील काळ नदीवरील भादाव पूलाची झालेली दुरवस्था

(२०) * ४७०४ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) तालुक्यातील काळ नदीवरील भादाव पूल वाहतूकीस अत्यंत धोकादायक असून अनेक ठिकाणी तडे जाऊन कोणत्याही क्षणी पूल कोसळून मोठा अपघात होईल, याबाबतची दुरुस्ती करण्याबाबत निवेदन देऊन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रशासनाकडे वारंवार मागणी करुनसुध्दा अद्याप कोणतीच कार्यवाही केली जात नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पुलाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली आहे ?

श्री. गिरीष महाजन : (१) अंशत: खरे आहे.

काळ नदीवर भादाव पूल नसून कालव्यावरील जलसेतू आहे. सदर जलसेतू हा सार्वजनिक वाहतुकीचा पूल नसून त्या पुलावरुन फक्त निरीक्षण वाहने ये-जा करणेची सोय करण्यात आलेली आहे. या जलसेतूवरील संरक्षण कठडा तुटलेला असून जलसेतूस कोणताही धोका नाही व कोणत्याही क्षणी पूल कोसळून मोठा अपघात होईल अशी वस्तुस्थिती नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पालघर जिल्ह्यात कुपोषणामुळे झालेले बालकांचे मृत्यू

(२१) * ४७७० श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अनिल भोसले, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात गेल्या तीन महिन्यात १७७ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यु झाल्याची धक्कादायक माहिती शासनाच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्ह्यातील तालुका निहाय मृत बालकांची संख्या किती आहे,

(४) असल्यास, बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होऊ नये म्हणून शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशतः खरे आहे.

पालघर जिल्हा परिषद अंतर्गत ग्रामीण क्षेत्रात गेल्या तीन महिन्यात (माहे नोव्हेंबर, २०१४ ते जानेवारी, २०१५) ११९ बालकांचे मृत्यू झालेले असून सदर मृत्यू कुपोषणामुळे झालेले नसून विविध कारणांमुळे झालेले आहेत.

(२) कुपोषणामुळे मृत्यू झालेले नसल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) पालघर जिल्ह्यातील ० ते ६ वर्षे वयोगटातील मृत बालकांची तालुकानिहाय संख्या पुढीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	तालुका	नोव्हेबर २०१४	डिसेंबर २०१४	जानेवारी २०१५	एकूण
१.	डहाणू	११	१५	१२	३८
२.	जव्हार	८	१२	९	२९
३.	विक्रमगड	२	६	४	१२
४.	मोखाडा	१	२	४	७

५.	पालघर	२	४	३	९
६.	तलासरी	५	४	२	११
७.	वाडा	२	२	३	७
८.	वसई	४	०	२	६
एकूण		**३५**	**४५**	**३९**	**११९**

(४) **कुपोषण व बालमृत्यू रोखण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-**

१. दोन बाळंतपणामधील अंतर वाढविणे, दोन अपत्यापर्यंत पाळणा थांबविणे या गुणात्मक दर्शकांच्या पूर्ततेवर भर दिला जातो.

२. गरोदर मातेची १६ आठवड्याच्या आत नोंदणी करुन धनुर्वात प्रतिबंधक लस, फेरस सल्फेटच्या १०० गोळ्या तीन महिन्यांसाठी दिल्या जातात.

३. जोखमींच्या मातांसाठी विशेष सेवा म्हणून हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असलेल्या मातांना फेरस सल्फेटच्या गोळ्या उपचारात्मक मात्रा दिल्या जातात व अशा मातांना प्रसुती पूर्व, प्रसुती अंतर्गत व प्रसुती पश्चात ४२ दिवसांपर्यत गुंतागुत उदभवू नये म्हणून मानव विकास कार्यक्रमांतर्गत त्यांची स्त्रीरोगतज्ञांकडून तपासणी व औषध उपचार करण्यात येतो.

४. जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत गरोदर मातांना प्रसुतीसाठी घरुन दवाखान्यात आणले जाते. सुरक्षित प्रसुतीनंतर घरी सोडले जाते व सदर कालावधीत त्यांना आहार देखील दिला जातो.

५. प्रसुतीनंतर बाळाचे वजन घेऊन नवजात बालकांची विशेष काळजी घेतली जाते.

६. सॅम व मॅम मधील बालकांची दरमहा वैद्यकीय तपासणी केली जाते. तसे ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना वर्षातून दोन वेळा अ जीवनसत्व व जंतनाशक औषधी दिली जातात.

७. अंगणवाडीमधील सर्व बालकांचे वेळापत्रकानुसार लसीकरण करण्यात येते.

८. कुपोषण कमी करण्याच्या दृष्टीने ग्राम बाल विकास केंद्र व बाल उपचार केंद्र घेण्यात आली.

९. गर्भवती स्त्रिया, स्तनदा माता व किशोरवयीन मुली यांना ७०० उष्मांक व २१ ते २४ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार दिला जातो.

१०. जिल्ह्यामध्ये एकूण ४ माहेरघर बांधण्यात आली असून त्याठिकाणी जोखमीच्या गरोदर मातांना प्रसुतीसाठी दाखल करण्यात येते व त्यांची प्रसुती नियोजनबध्द करण्यात येते.

११. दुर्गम भागामध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी शिबीरे आयोजित करण्यात आली असून या शिबीरांमध्ये जोखमीच्या गरोदर मातांची स्त्रीरोगतज्ञांमार्फत तपासणी करुन आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देण्यात येते. सर्व गरोदर स्त्रिया, स्तनदा माता तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांची तज्ञामार्फत तपासणी करुन औषधोपचार करण्यात येते.

पूर्णा प्रकल्प (ता.चांदूररेल्वे, जि.अमरावती) यांचे नियोजनाअभावी कालव्यातील हजारो लिटर पाणी वाया जात असल्याबाबत

(२२) * **५७१३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्णा प्रकल्पाचे (ता.चांदूररेल्वे, जि.अमरावती) ढिसाळ नियोजनाअभावी कालव्यातील हजारो लिटर पाणी वाहत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर प्रकल्पाच्या पाण्याची पातळी वाढविण्यासाठी व सदर प्रकल्पातील पाणी वाया जाऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) नाही.

(२) व (३) पाणी वाया जात नसल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे चौकशी करण्यात आली नाही. सदर प्रकल्पाचे मुख्य कालवा व वितरण प्रणालीची कामे पुर्ण झाली असुन विमोचकाखालील भागात पाटचाऱ्याऐवजी पी.व्ही.सी. पाईप लाईनचे कामे पूर्ण करण्यात येवून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचन सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिध्देश्वर (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अंगणवाडी शाळांमध्ये जंतनाशक गोळया घेतल्याने बालिकेचा झालेला मृत्यू

(२३) * **५८६५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिध्देश्वर (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) येथील अंगणवाडी शाळेतील दीड वर्षाच्या बालिकेचा जंतनाशक गोळी खाल्ल्याने मृत्यू झाल्याची घटना दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याच सुमारास कळमनुरी तालुक्यातील मसोड आणि वारंगा येथील अंगणवाडी शाळांमध्येही जंतनाशक गोळी खाल्याने ४५ बालकांना रुग्णालयात दाखल करावे लागले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या घटनांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे आहे.

सिध्देश्वर अंगणवाडी क्र.१ (ता.औंढा नागनाथ, जि. हिंगोली) येथील अंगणवाडी केंद्रातील बालिकेचा जंतनाशक गोळी तोंडावाटे घेत असतांना श्वसन नलीकेमध्ये अडकल्यामुळे मृत्यू झाला आहे.

(२) वारंगा मसई ता.कळमनुरी जि.हिंगोली येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत दि. १०/०२/२०१५ रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेअंतर्गत शाळेतील एकुण ८५ विद्यार्थ्यांना गोळ्या देण्यात आल्या होत्या. त्यापैकी ३४ विद्यार्थ्यांना मळमळ, उलटी, डोकेदुखी व त्वचेवर पुरळ असे प्रकार आढळून आले. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्र मसोड येथे त्यांचेवर प्राथमिक उपचार करुन त्यांना ग्रामीण रुग्णालय कळमनुरी येथे संदर्भित केले. ग्रामीण रुग्णालय कळमनुरी येथे सदर ३४ विद्यार्थ्यांवर उपचार करुन त्यापैकी ३० विद्यार्थ्यांना त्याच दिवशी संध्याकाळी ६.०० च्या सुमारास डिसचार्ज दिला. उर्वरित ४ विद्यार्थ्यांना दुस-या दिवशी दि ११/०२/२०१५ रोजी डिसचार्ज देण्यात आला.

(३) व (४) मौ.सिध्देश्वर (ता.औंढा नागनाथ, जि. हिंगोली) येथील प्रकरणी तालुका आरोग्य अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी, ता.औंढा ना.यांनी सखोल चौकशी केलेली आहे. तालुका आरोग्य अधिकारी / बाल विकास प्रकल्प अधिकारी, ता.औंढा ना.यांचा अहवाल व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.हिंगोली यांचे अभिप्रायानुसार अंगणवाडी क्रं.१ मधील अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांना मानधनी सेवेतून कमी करण्यात आले असून आशा स्वयंसेविका यांचेवर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत तालुका आरोग्य अधिकारी, औंढा ना. यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

सोलापूर जिल्ह्यातील लॉटरी पद्धतीने कामांचे वाटप न झाल्याबाबत

(२४) * ५८९२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता संघटनेस जिल्हा परिषद बांधकाम विभागातील लॉटरी पद्धतीने कामांचे वाटप न होणे तसेच सदर संघटनेची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे व जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाकडे कोटयवधी रुपयांची थकित देयके तात्काळ मिळावीत व इतर मागण्यासाठी सदर संघटनेने दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संघटनेने आपल्या विविध मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी, सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडे दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर संघटनेची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे व जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम विभागाकडे किती रुपयांची देयके थकित आहेत, देणे पेंडींग आहे,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, असल्यास, आतापर्यंत सदर संघटनेची किती रुपयांची देयके त्यांना अदा केलेली आहेत, वा करण्यात येत आहेत,
(५) अद्याप, उपरोक्त प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषण केलेले होते, हे खरे आहे.
(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडे निवेदन दिलेले आहे, हे खरे आहे.
(३) सुशिक्षित बेरोजगार स्थापत्य अभियंता संघटनेची जिल्हा परिषद सोलापूर, बांधकाम विभाग क्र. १ व २ कडे एकूण रु. १५५.६८ लक्ष व सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रु. ७.४२ लक्ष किंमतीची देयके प्रलंबित आहेत.
(४) व (५) सदर संघटनेस जिल्हा परिषद सोलापूर, बांधकाम क्र. १ व २ विभागांनी एकूण रु. ८.८७ लक्ष ची देयके अदा केली आहेत. तर सार्वजनिक बांधकाम विभागाने रु. १३.५० लक्ष देयके अदा केली आहेत. निधीच्या उपलब्धतेनुसार पेंडीग बिले प्राधान्यक्रमाने अदा करण्याचे जिल्हा परिषद व सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना विद्युत जोडण्या देणेबाबत

(२५) * ५९०६ श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.जयवंतराव जाधव, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्ह्यातील ५० ग्रामपंचायतीमध्ये वीज जोडण्या दिल्या नसतांना ग्रामपंचायतींना शासनाने ग्रामपंचायतीचा कारभार ऑनलाईन करण्यासाठी संगणक पुरविण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर संगणक वापराविना सद्यःस्थितीत पडून आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर ग्रामपंचायतींना विद्युत जोडण्या देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत एकूण १२१० ग्रामपंचायतीपैकी १०७७ ग्रामपंचायतीमध्ये वीज जोडणी आहे व १३२ ठिकाणी पर्यायी व्यवस्था म्हणून जिल्हा परिषद शाळा व शेजारील इमारती यांचेकडून वीजपुरवठा घेऊन माहिती ऑनलाईन करण्याचे कामकाज सुरु आहे.
(२) नाही.
(३) व (४) ज्या ग्रामपंचायतींना विद्यूत पुरवठा झालेला नाही, त्या ग्रामपंचायतींना नव्याने विद्यूत पुरवठा जोडण्याकरीता ग्रामपंचायतीकडून वीज वितरण कंपनीकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. तसेच वनक्षेत्रातील वीज नसलेल्या ग्रामपंचायतींसाठी सौरउर्जा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

सिल्लोड ता.जि.औरंगाबाद येथे सिमेंट बंधाऱ्यांच्या कामात झालेला गैरप्रकार

(२६) * **५९६० श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड ता, जि.औरंगाबाद येथे मोठया प्रमाणावर सिमेंट बंधाऱ्याची कामे करण्यात आली असून यातील अनेक सिमेंट बंधाऱ्याचे कामे ठेकेदारांनी गैरपध्दतीने केली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी अद्याप पर्यंत या सिमेंट बंधाऱ्यांना भेट देऊन पाहणीही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी करुन दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

सिल्लोड तालुक्यात लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, औरंगाबाद अंतर्गत विविध शिर्षाखाली १०४ बंधा-याची कामे मंजूर आहेत. मंजूर कामांपैकी ९५ बंधा-याची कामे पुर्ण झालेली असुन उर्वरित ९ बंधा-याची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

(२) हे खरे नाही.

कामे प्रगतीपथावर असतांना शाखा अभियंता व उपविभागीय अभियंता या पर्यवेक्षकीय अधिकाऱ्यांनी कामास भेटी दिलेल्या आहेत. कामांची देयके अदा करताना काम योग्य प्रकारे झाल्याचे तपासुन देयक देण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी केलेली आहे. पुर्ण झालेल्या बंधा-यामध्ये सन २०१४ च्या पावसाळयामध्ये पुर्ण संचय पातळीस पाणी साठा झालेला होता.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी केलेला गैरव्यवहार

(२७) * **६१४३ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील फुलंब्री पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी १ कोटी ५ लाख रुपयांची अनियमितता केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१५ रोजीच्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर गटविकास अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.

(२) व (३) नाही. तथापि, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्यास्तरावर प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये कोणताही अपहार झाल्याचे सिध्द झालेले नाही. तथापि एका लेखाशिर्षकातून दुस-या लेखाशिर्षकात नियमबाह्यपणे निधी वर्ग केलेला आहे. याबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मराठी चित्रपट-नाटकांना मिळणा-या अनुदानाच्या धर्तीवर संपूर्ण मराठी कर्मचारी, खाद्यपदार्थ असलेल्या हॉटेलांना करामध्ये सवलत मिळण्याबाबत

(२८) * ६२०८ श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी चित्रपट-नाटकांना मिळणा-या अनुदानाच्या धर्तीवर संपूर्ण मराठी कर्मचारी, खाद्यपदार्थ असलेल्या हॉटेलांना करामध्ये सवलत मिळावी अशी मागणी मुंबईतील मराठी हॉटेल व्यावसायिकांनी शासनाकडे केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील मराठी हॉटेल व्यावसायिकांनी कर सवलतीबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) सदर प्रश्नाबाबतच्या संबंधीचे निवेदन शासनास प्राप्त झालेले नाही.

(२) लागू नाही.

(३) लागू नाही.

खामगांव (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत

(२९) * ४०४३ श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगांव (जि.बुलढाणा) ग्रामीण भागातील बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना शहरी भागातील रुग्णालयात उपचारासाठी जावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) व (२) नाही.

बुलढाणा जिल्ह्यातील खामगांव तालुक्यामध्ये एकूण ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे कार्यान्वित आहेत. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची १० पदे मंजूर असून एक पद रिक्त आहे.

उपलब्ध वैद्यकीय अधिका-यांमार्फत रुग्णांना आवश्यक त्या रुग्ण सेवा वेळीच पुरविण्यात येत आहेत.

(३) वैद्यकिय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे भरण्याबाबत स्वतंत्र निवड मंडळामार्फत कार्यवाही सुरु आहे, तसेच वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांवर कंत्राटी पध्दतीने नेमणुका देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असून त्यानूसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जिल्हा शासकीय रुग्णालय (बीड) येथील तंत्रज्ञ व डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबाबत

(३०) * ३६६३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३६१ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा शासकीय रुग्णालय (बीड) येथील आधुनिक यंत्रणा चालविण्यासाठी पुरेसे प्रशिक्षित तंत्रज्ञ अपुरे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा रुग्णालयातील अत्यावश्यक तंत्रज्ञ व डॉक्टर्स यांची रिक्त पदे भरणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, रुग्णालयातील चार डायलिसिस मशिन कॅव्हापासून कार्यान्वीत झाल्या, आजवर किती गरजुंनी या सुविधेचा लाभ घेतलेला आहे,

(४) असल्यास, रुग्णालयात उक्त तंत्रज्ञ व डॉक्टर्स यांच्या रिक्त पदांमुळे रुग्णांना होणारा त्रास थांबविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

डॉ. दीपक सावंत : (१) अंशतः खरे आहे.

(२) वैद्यकीय अधिका-यांची पदे भरण्याबाबत कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच विशेष निवड मंडळाकडून सदर रिक्त पदांवर उमेदवार उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तंत्रज्ञांची पदे भरण्याबाबत क्षेत्रीय स्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) बीड जिल्हा रुग्णालयातील ४ डायलिसीस मशिन दिनांक १७/०९/२०१३ पासुन कार्यान्वित झालेल्या असुन आजपर्यंत एकूण १८८७ गरजुंना या सेवेचा लाभ देण्यात आलेला आहे.

(४) डायलिसीस विभागात नियमित सेवेतील दोन वैद्यकीय अधिकारी, दोन स्टाफ नर्स व तीन कंत्राटी डायलिसीस टेक्निशिअन कार्यरत आहेत. तसेच नेफ्रोलॉजिस्ट पदाचे काम एम.डी. (मेडीसीन) वैद्यकीय अधिका-याकडून करण्यात येत आहे.

मौजे कुरण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे सिमेंटचे बंधारे बांधण्याबाबत

(३१) * ५८५७ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कुरण (ता.जुन्नर, जि.पुणे) येथे सिमेंटचे बंधारे बांधण्याबाबत स्थानिक ग्रामपंचायतीने आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी पंचायत समिती, जुन्नर यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी प्रस्ताव पाठवून सिमेंट बंधाऱ्यांना मान्यता देण्यात यावी अशी मागणी करुनही अद्याप बंधाऱ्यांना मान्यता देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप बंधाऱ्यास मान्यता न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) व (२) होय.

मौजे कुरण, तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथे सिमेंट बंधारे बांधणे बाबतचे स्थानिक खासदारांचे पत्र जिल्हा परिषदेच्या विभागीय कार्यालयास प्राप्त झाले आहे. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षातील निधीचे नियोजन सप्टेंबर, २०१४ मध्ये झाल्याने सदर कामास निधी अभावी मान्यता देण्याची कार्यवाही होऊ शकली नाही.

(३) बंधा-याचे अंदाजपत्रक आर्थिक मापदंडात बसल्यानंतर तसेच कामाचे सर्व्हेक्षणानंतर निधी उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा करुन नागरी सुविधा देण्याबाबत

(३२) * ३४७८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तयार करुन सदर गावांना विविध नागरी सुविधा देण्याचा निर्णय शासनाने दिनांक १६ सप्टेंबर, २०१० रोजी घेतलेला असूनही नाशिकसह बहुतांश जिल्ह्यांमध्ये अद्यापही सदर निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार ५००० लोकसंख्येच्या गावांचा समावेश करण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी २०१५ मध्ये शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार राज्यातील ५००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांचा ग्रामविकास व पर्यावरण विकास आराखडा तातडीने तयार करुन तेथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी शासनामार्फत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे

(६) तसेच प्रश्न भाग (२) बाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) माहे जानेवारी, २०१५ मध्ये लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केल्याबाबतचे पत्र या विभागाकडे आढळून येत नाही. तथापि माहे मार्च, २०१५ मध्ये अशी एक मागणी प्राप्त झालेली आहे. तसेच ग्रामपंचायत भोजापूर, पंचायत समिती, भंडारा यांनी जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) राज्यात आतापर्यंत ३११ ग्रामपंचायतीचे पर्यावरण विकास आराखडे तयार करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहेत.

(६) मागणी प्रमाणे तपासणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

राजीव गांधी जीवनदायी योजनेचा फायदा राज्यातील सर्व सामान्य जनतेला मिळण्यासाठी करावयाची कार्यवाही

(३३) * ३७०३ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांसाठी राजीव गांधी जीवनदायी योजना राबविण्यात आली आहे परंतु सदर योजनेचा फायदा सर्वसामान्य जनतेला मिळत नसून अनेक रुग्णालये या योजनेचा फायदा मिळवून देण्यासाठी कार्यवाही करत नसल्याची बाब जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेअंतर्गत मान्य झालेल्या रुग्णालयांना ऑनलाईन माहिती देण्याचे बंधन घालण्यासंदर्भात राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या योजनेत पात्र असणाऱ्या रुग्णांस उपचार देण्यासंबंधीत रुग्णालयाने नकार दिल्यास राज्य शासनाने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) नाही. सदर योजना सुरू झाल्यापासून दि. ११ मार्च, २०१५ पर्यंत एकूण ४,३१,६६१ रुग्णांवर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले आहेत.

(२) सदर योजना संपूर्णपणे संगणीकृत असल्यामुळे योजने अंतर्गत रुग्णांची नोंदणी, प्रिऑथॉरायझेशन मंजूरी, रुग्णांचे केसपेपर व इतर वैद्यकीय कागदपत्र अपलोड करणे, रुग्णांस सुट्टी दिल्यानंतर त्याबाबतची माहिती संगणक प्रणालीवर अपलोड करणे, उपचारांचे क्लेम सादर करणे, इत्यादी बाबी ऑनलाईनच करण्यात येतात.

(३) योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांची नोंदणी किंवा उपचार करण्यात नकार दिल्याबाबतच्या आतापर्यंत २२५ तक्रारी प्राप्त झाल्या असुन त्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये तक्रारीमध्ये तथ्य आढळून आल्याने ७४ रुग्णांना दाखल करुन घेण्यात आले. तर अन्य प्रकरणी मागितलेले उपचार योजनेंतर्गत समाविष्ट ९७१ उपचार पद्धतीत बसत नसल्याने नाकारण्यात आले. तसेच एका रुग्णालयाने उपचार नाकारल्याबाबतच्या ३ तक्रारी प्राप्त झाल्याने सदर रुग्णालयास टी.पी.ए.मार्फत कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आली होती. परंतु रुग्णालयाकडुन समाधानकारक स्पष्टीकरण प्राप्त न झाल्याने दि.६ जून, २०१४ पासुन सदर रुग्णालयाचे अंगीकरण रद्द करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) बेघर कुटुंबियांना घरकुल योजनेअंतर्गत दुसरा व तिसरा हप्ता देण्यासंदर्भात

(३४) * ३८६८ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ९४५ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) १९७ बेघर कुटुंबियांना पात्र ठरवून त्यांना घरकुल योजनेचा दुसरा हप्ता देण्यात न आल्याने याबाबत संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द खातेनिहाय चौकशी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खातेनिहाय चौकशीची सद्यस्थिती काय आहे,

(३) असल्यास, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास उप सचिव, ग्रामीण विकास विभाग, मुंबई यांनी दिलेल्या सुचनेनुसार बेघर कुटुंबियांच्या घरकुल संदर्भात दुसरा व तिसरा हप्ता देण्याचा प्रस्ताव दिनांक २१ नोव्हेंबर, २०१४ रोजीच्या पत्रानुसार प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना सादर झाला आहे त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) विभागीय आयुक्त, कोकण यांना प्रधान सचिव (ग्रामविकास) यांच्या स्वाक्षरीने अर्ध शासकीय पत्र पाठविण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे जिल्हा परिषदेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी साहित्य खरेदीत करण्यात आलेल्या गैरव्यवहाराबाबत

(३५) * ४२०६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हा परिषदेने मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी साहित्य खरेदीत लाखो रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले वा त्यानुसार या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

(२), (३), (४) प्रश्न उद्भवत नाही.

उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब पंचायत समितीकडे बनावट कागदपत्राद्वारे झालेला गैरव्यवहार

(३६) * ५४०८ श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब पंचायत समितीकडे बनावट कागदपत्राद्वारे सुमारे अडीच कोटी रुपयांची देयके ठेकेदारांनी सादर केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार बनावट कागदपत्राद्वारे देयके सादर करणाऱ्या ठेकेदारावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) अंशतः खरे आहे.

(२) सदर प्रकरणाची चौकशी तहसिलदार, कळंब व उपविभागीय अधिकारी, कळंब यांचेमार्फत करण्यात आली आहे.

(३) सदर चौकशीत ८ कामे संबंधित यंत्रणेमार्फत झाली नसल्याचे स्पष्ट झाले असून मूळ अभिलेख गहाळ करणे, अभिलेख उपलब्ध नसताना संकेतस्थळावर देयकांची नोंद करणे. हजेरी पत्रकावर ग्राम रोजगार सेवकाची स्वाक्षरी नसणे या बाबी आढळून आल्या आहेत.

याकरिता जबाबदार असलेले तत्कालीन ४ अधिकारी व ३ कर्मचारी यांचेवर गुन्हा नोंदविण्याचे आदेश जिल्हाधिकारी, उस्तानाबाद यांनी दि. १२/३/२०१५ च्या आदेशान्वये तहसिलदार कळंब यांना दिले आहेत. तसेच सर्व संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, या चौकशीअंती दोषी आढळून आल्यास सर्व संबंधिताविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौ.हाळी खुर्द (ता.चाकूर, जि.लातूर) येथील जमीन भूसंपादितांना निधी वितरीत करण्याबाबत

(३७) * ६१३५ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.हाळी खुर्द पाझर तलाव क्र. ११ (ता.चाकूर, जि.लातूर) येथील जमीन भूसंपादन निवाड्यातील प्रस्तावित दरास कलम ११ खाली अंतिम निवाड्याची रक्कम रु. ६,३०,८०० इतक्या निधीची मागणी विशेष भूसंपादन अधिकारी, स्वर्णा प्रकल्प, लातूर यांनी जिल्हाधिकारी, रोहयो, लातूर यांच्याकडे दिनांक २५ जुलै, २०११ रोजी केलेली असतानाही माहे फेब्रुवारी, २०१५ अखेरपर्यंत निधी वितरीत करण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती उपरोक्त निधी तातडीने वितरीत करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करणार आहे,

(४) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) मौ.हाळी खुर्द, पाझर तलाव क्र. ११ बाबत अंतिम निवाडयाची रक्कम रु. ४,०१,७२०/- संबंधीतास दि. ०७/०३/२०१३ रोजी वाटप करण्यात आली आहे.

मौजे हाळी खुर्द, पाझर तलाव क्र. १० च्या अंतिम निवाडयाची रक्कम रु. ६,३०,८००/- आहे.

सदर रक्कम मंजूर करण्याचा प्रस्ताव विशेष भूसंपादन अधिकारी स्वर्णा प्रकल्प, लातूर यांनी दि. २५.७.२०११ रोजी जिल्हाधिकारी, लातूर यांना सादर केला होता.

जिल्हाधिकारी, लातूर यांनी हा प्रस्ताव दि. २०.९.२०११ रोजी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केला. त्यामध्ये पाझर तलावाच्या सद्य:स्थितीचे विवरणपत्र नसल्याने तो दि. ३०.११.२०११ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास परत करण्यात आला हा प्रस्ताव फेरसादर केलेला नाही.

सदर प्रस्ताव शासनास प्राप्त न झाल्याने निधी वितरीत करण्यात आला नाही.

(२) नाही.

(३) सदर प्रकरणी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) विशेष भूसंपादन अधिकारी स्वर्णा प्रकल्प, लातूर हे कार्यालय निरस्त झाल्यामुळे संचिकेची छाननी व इतर दस्तऐवज उपविभागीय अधिकारी, अहमदपूर यांच्याकडे वर्ग करण्यासाठी लागलेल्या कालावधीमुळे विलंब झाला आहे.

राज्यात विशेषत: गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात अवजड लाकडाची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

(३८) * **२९५९ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: गडचिरोली व गोंदिया जिल्ह्यात वन विभागातील अवजड लाकडाची तस्कराकडून तस्करी केल्याने सन २०११ ते २०१४ या ३ वर्षात २८ कोटी ६४ लाख २६ हजार रूपयाचे नुकसान झाल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत किती तस्करांवर शासनाने कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) राज्यातील वनक्षेत्रात अधिकारी जानेवारी, २०११ ते मार्च, २०१४ या कालावधीत झालेल्या अवैध वृक्षतोडीमुळे २८ कोटी ६४ लाख २६ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वनविभाग वगळता इतर ठिकाणी झालेली वृक्षतोड जंगलालगतच्या गावातील रहिवाश्यांनी जळाऊ लाकूड, शेती अवजारे व इतर दैनंदिन गरजा भागिवण्यासाठी केले असल्याचे निदर्शनास आले आहे. वरील नुकसानी पैकी १४ कोटी ९१ लाख १६ हजार इतके नुकसान गडचिरोली जिल्ह्यातील आहे. गोंदिया वन विभागातील नुकसानीची किंमत १ कोटी ३९ लाख ३७ हजार इतकी आहे.

(२) व (३) गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा वनविभागात वन गुन्ह्यांमध्ये वन विभागामार्फत तस्करांवर केलेली कार्यवाही खालीलप्रमाणे आहेः-

वर्ष	एकूण वनगुन्हे	पकडलेले आरोपी	न्याय प्रविष्ठ प्रकरणे
२०११	७९९	५०	८१
२०१२	९१८	८८	८६
२०१३	६८४	४५	८३
२०१४	७९४	६७	११२

या व्यतिरिक्त वनतस्करीपासून परावृत्त करण्यासाठी वनविभागाने केलेल्या प्रयत्नामुळे आता पर्यंत २० गावातील ३१२ लाकूड तस्करांनी आत्मसमर्पण केले आहे.

दिग्रस तालुक्यात (जि.यवतमाळ) कृषी विभागांतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेत झालेला गैरव्यवहार

(३९) * **३३१५ श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिग्रस तालुक्यातील (जि.यवतमाळ) कृषी विभागांतर्गत महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत तालुका कृषी कार्यालयाअंतर्गत ६ गावांमध्ये रोपवाटिका सुरू करण्यात आल्याचे कागदोपत्री बोगस हजेरीपत्रक दाखवून ७ लाख ३६ हजाराचा निधीची उचल केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधीत दोषी कर्मचाऱ्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी तालुका कृषि अधिकारी कार्यालय दिग्रस यांच्यामार्फत ६ गावांमध्ये रोपवाटीका सुरू करण्यांत आल्या होत्या.

त्या अंतर्गत रु.७ लाख ३३ हजार इतका निधी खर्च करण्यांत आला आहे.

सदर निधी मजूरांच्या बँक खात्यात जमा करण्यांत आला आहे.

सदर प्रकरणी तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

परभणी-हिंगोली जिल्हयातील शतकोटी वृक्षलागवडीमध्ये झालेला गैरव्यवहार

(४०) * २८०८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमआरईएस योजनेमार्फत परभणी व हिंगोली जिल्हयात राबविण्यात आलेल्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेवर कोट्यावधी रुपयांचा खर्च होऊनही प्रत्यक्षात या योजनेस अपयश आल्याबाबत संबंधित यंत्रणा व अधिकारी यांच्याविरुध्द कारवाई करून झालेल्या नुकसानीची संबंधितांकडून वसुली करण्यात यावी अशी मागणी मराठवाडा जनता विकास परिषद, परभणी मार्फत प्रधान सचिव, रोहयो यांच्याकडे सन २०१४-२०१५ दरम्यान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवड व संगोपन यात अपयशी ठरलेल्या व संगनमताने कोट्यावधी रुपयांचा गैरप्रकार करणाऱ्या संबंधित अधिकारी व यंत्रणा यांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) मराठवाडा जनता विकास परिषद, परभणी यांची मागणी प्राप्त झालेली नाही. तथापि, रोपे लागवड झाल्यानंतर कमी पाऊस, तीव्र पाणी टंचाई, दुष्काळ सदृश्य परिस्थिती, तापमानात सरासरीपेक्षा जास्त वाढ या कारणांमुळे जीवंत झाडाचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील रेवदंडा ग्रामपंचायतीचे विभाजन करण्याबाबत

(४१) * ४७०७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील रेवदंडा ग्रामपंचायतीचे विभाजन करुन रेवदंडा व थेरोंडा ग्रामपंचायत वेगळी करावी अशी मागणी तेथील जनतेने शासनाकडे गेल्या अनेक महिन्यांपासून केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तेथील जनतेची मागणी लक्षात घेता शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास, सर्वसाधारण कारणे कोणती ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, सदरहू ग्रामपंचायतींच्या विभक्तीकरणाचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनास प्राप्त झाल्यानंतर त्यावर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

जिल्हा शासकीय रुग्णालय (रत्नागिरी) येथे सोनोग्राफीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

(४२) * ६२४५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हा शासकीय रुग्णालयात अत्याधुनिक सोनोग्राफी सेंटर असूनही गेले अनेक वर्ष रेडिओलॉजिस्ट नसल्याने सदरचे सेंटर कार्यरत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे रुग्णालयात दाखल होणा-या सर्वसामान्य व गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात जावून सोनोग्राफी करावी लागत आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्री अपरात्री गंभीर स्वरुपाच्या रुग्णांची सोनोग्राफी अभावी गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासकीय रुग्णालयातील सुविधा सक्षम होण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. दीपक सावंत : (१) हे अंशत: खरे आहे.

सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथे महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील विशेषज्ञ संवर्गातील क्ष-किरण तज्ञाचे एक पद मंजूर असून सध्या सदर पद रिक्त आहे. तथापि, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत क्ष-किरण तज्ञाची कंत्राटी स्वरुपात नियुक्ती करण्यात आली असून सदर तज्ञाच्या सेवा रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णांची गैरसोय होत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) सामान्य रुग्णालय, रत्नागिरी येथील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा, गट-अ मधील विशेषज्ञ संवर्गातील क्ष-किरण तज्ञाचे पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

कोळेगांव व शिर्गोणी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील वाड्या वस्त्यांवरील रस्त्यांचे खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत

(४३) * ५९०० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळेगांव (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील वाड्या वस्त्यांवरील रस्ते हे अत्यंत खराब झालेले असून तेथील नागरिकांना व वाहन चालकांना अत्यंत त्रास होत आहे त्यामुळे शासनाने सदरचे रस्ते तातडीने खडीकरण व डांबरीकरण करून द्यावेत म्हणून ग्रामपंचायतीने कार्यकारी अभियंता, जि.प.सोलापूर आणि अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचेकडे दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास ग्रामपंचायतींचा ठराव दिलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिर्गोणी (ता.माळशिरस, जि.सोलापूर) येथील ग्रामपंचायतीने शिर्गोणी ते कोळेगांव हा रस्ता खडीकरण व डांबरीकरण होणेसाठी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी कार्यकारी अभियंता, जि.प.सोलापूर आणि अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग सोलापूर यांचेकडे ग्रामपंचायतीचा ठराव दिलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने वरील गावाचे रस्ते खडीकरण व डांबरीकरण तातडीने करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) कोळेगाव ग्रामपंचायतीने कार्यवारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद सोलापूर यांच्याकडे ठराव दिलेला आहे.

(२) शिर्गाणी ग्रामपंचायतीने कार्यकारी अभियंता (बांधकाम) जिल्हा परिषद सोलापमर यांच्याकडे ठराव दिलेला आहे.

(३) कोळेगाव व शिर्गाणी या ग्रामपंचायतीमधील प्रश्नांकीत १० रस्त्यांपैकी ५ रस्ते हे योजनबाह्य रस्ते आहेत.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २,३६,००० कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते.

सोलापूर जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी १०९७०.६३ कि.मी. आहे. रस्ते पूल दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१३-१४ ते २०१४-१५ मध्ये रु. १३६४.८५ लक्ष निधी वितरित करण्यात आला आहे. तर तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये सोलापूर जिल्हा परिषदेस रु. ३४८.४१ लक्ष निधी वितरीत करण्यात आला असून सन २०१४-१५ अंतर्गत रु. ३७०.५० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१३-१४ मध्ये पुरहानी कार्यक्रमाअंतर्गत रु ६३२.२५ लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

सदर रस्त्यांच्या नादुरुस्त लांबीमधील दुरुस्तीचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त होणा-या निधी व निकषाच्या अधिनतेने व प्राधान्य क्रमाने हाती घेण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड जिल्ह्यातील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे बसविण्याच्या प्रस्तावाबाबत

(४४) * ३६५३ श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९५ ते २००२ या कालावधीत बीड जिल्ह्यात बांधण्यात आलेल्या ३४७ कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे बसवून त्याची दुरुस्ती करण्याचा ३७ कोटी रुपयांचा प्रस्ताव जिल्हा परिषद, बीड यांचेकडून शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांना दरवाजे नसल्यामुळे सुमारे ८४४.१५ दशलक्ष घनफूट पाणी वाहून जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील सततची टंचाई व दुष्काळ परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हा परिषद बीड यांनी पाठविलेल्या प्रस्तावास मंजुरी देण्याची कार्यवाही शासन करणार आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (२) व (३) दुरुस्ती व परिरक्षण योजनेखाली निधी मागणी प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती शासन परिपत्रक दिनांक ०७/११/२०१३ प्रमाणे निर्धारित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद बीड यांनी दिनांक २९/१२/२०१४ च्या पत्रान्वये सादर केलेला रु.३७.१० कोटी दायित्वाचा दुरुस्ती निधी प्रस्ताव सदर परिपत्रकानुसार पाठविण्यात आला नसल्याने दुरुस्ती कामांची शासन परिपत्रक दिनांक ०७/११/२०१३ प्रमाणे काटेकोर छाननी करण्यासाठी सदर प्रस्ताव परत करण्यात आला आहे.

दरम्यानच्या काळात मराठवाडा विभागातील लघु सिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या खराब व गहाळ झालेल्या ३४,१६५ दरवाजांच्या जागी नवीन दरवाजे बसविण्याचा रु. २३.९२ कोटी दायित्वाचा प्रस्ताव दिनांक १३/०३/२०१५ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण), पुणे कार्यालयाने शासनाकडे सादर केला आहे. निधी उपलब्धतेनुसार शासनाकडून यावर योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथे कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दरवाजाला गळती लागल्याबाबत

(४५) * **३८६९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागोठणे (ता.रोहा, जि.रायगड) येथील खाडीत भरतीच्या वेळी अरबी समुद्राचे खारे पाणी येऊन ते अंबा नदीपर्यंत थांबले जात होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी असलेल्या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांच्या दरवाजाला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने या बंधाऱ्यातून खाडीत गोडे पाणी मिसळल्यामुळे त्या ठिकाणी होणाऱ्या मच्छिव्यवसायावर परिणाम झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या ठिकाणी मच्छिमारी करण्यासाठी सुमारे ५० होड्या कार्यरत असून या व्यवसायीकांनी पाटबंधारे विभाग कोलाड (ता.रोहा, जि.रायगड) यांच्याकडे गळती संबंधी तक्रार करूनही त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

बंधा-यातून होणारी गळती ही आवश्यक उपाययोजना करुन कमी करण्यात आली आहे. गळतीचे प्रमाण अत्यल्प असल्याने मच्छी व्यवसायावर परिणाम झालेला नाही.

(३) हे खरे नाही.

गळती संबंधी काही मत्स्यव्यावसायिकांनी दि.२४.१२.२०१४ व ३०.०१.२०१५ च्या पत्राने संबंधित क्षेत्रीय अधिका-याकडे तक्रारी केली होती व या तक्रारीच्या अनुषंगाने बंधा-यातून होणारी गळती ही वक्रद्वाराच्या सांध्यातून वक्रद्वारे व स्तंभाच्या सांध्यातून असल्याने कॉटन वेस्ट/गोणपाटाच्या सहाय्याने गळती कमी करण्यात आल्याबाबत क्षेत्रिय स्तरावरुन संबंधितांना दि.१७.०१.२०१५ व दि.२५.२.२०१५ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केळकर समितीच्या अहवातील शिफारशींवर निर्णय घेण्याबाबत

(४६) * ४२०७ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.राजेंद्र मुळक, ॲड.अनिल परब : सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विकासाच्या अनुशेषाबाबत डॉ.विजय केळकर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींचा अभ्यास करुन कोणत्या शिफारशी स्वीकारायच्या आणि कोणती कृती करायची याबाबतचा कृती अहवाल तयार करण्याची जबाबदारी शासनाने राज्याचे मा.अर्थमंत्री यांच्यावर सोपविली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतचा अभ्यास करुन कृती अहवाल तयार करण्यात आला आहे काय, असल्यास, कृती अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, समतोल प्रादेशिक विकासासाठी स्थापन केलेल्या केळकर समितीच्या अहवालातील शिफारशींवर निर्णय घेण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप निर्णय घेण्यात आला नसल्यास, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१), (२), (३), (४) व (५) डॉ. विजय केळकर समितीच्या अहवालातील शिफारशी व प्रशासकीय विभागांचे त्यावरील अभिप्राय विचारात घेऊन, शिफारशी स्विकारण्या संदर्भात अहवाल सादर करण्यासाठी दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मा.मंत्री, वित्त व नियोजन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. केळकर समितीच्या अहवालातील शिफारशींवर सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सर्व प्रशासकीय विभागांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतन ते उप समितीसमोर सादर केले जातील. यासंदर्भात उप समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळास सादर करावयाचा आहे.

रायपाटण टक्केवाडी (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीतील स्थावर मालमत्तेवर झालेले अतिक्रमण हटविण्याबाबत

(४७) * ६४४९ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायपाटण टक्केवाडी (ता.राजापूर,जि.रत्नागिरी) ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे क्र. ३६-अ -२, हिस्सा क्र.२० या स्थावर मालमत्तेवर ग्रामपंचायतीच्या संगनमतामुळे झालेले अतिक्रमण हटविण्यात यावे म्हणून ग्रामस्थांनी तहसिलदार, राजापूर, गटविकास अधिकारी, राजापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, सचिव, ग्रामविकास, जलसंधारण विभाग, यांचेकडे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्रीमती पंकजा मुंडे : (१) होय.
(२) व (३) रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र.३६-अ१, हिस्सा क्र. २० मधील सह हिस्सेदार श्री. राजाराम तुकाराम कोलते यांनी ग्रामपंचायतीकडे सादर केलेला स.नं.३६-अ, हिस्सा नं. २० चा ७/१२ उतारा, स्थळ दर्शक नकाशा, सहायक अधिक्षक, जिल्हा न्यायालय रत्नागिरी यांचेकडील जागे संबंधिचे कच्चे वाटप पत्र व हमीपत्र इ. कागदपत्रांच्या आधारे ग्रामपंचायत रायपाटण यांनी मासिक सभा दि. २६/०९/२०१३ ठराव क्र ६(६) अन्वये ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ५२ नुसार अटी व नियम यांना अधीन राहुन श्री. राजराम तुकाराम कोलते यांना रायपाटण ग्रामपंचायत क्षेत्रातील भूमापन क्र. ३६-अ-१, हिस्सा क्र. २० मध्ये घर बांधकामास परवानगी दिली आहे.

वरील मिळकतीच्या वाटपाबाबत मे. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) राजापूर यांचेकडे दाखल करण्यात आलेल्या रेग्युलर दिवाणी दरखास्त नं. २३/२०१२ मध्ये दि.२२ ऑक्टोबर, २०१२ च्या आदेशान्वये सदर मिळकतीच्या वाटपाकरीता जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना आयुक्त म्हणून नेमण्यात आले आहे. सदर प्रकरणी अंतिम वाटपासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मूल, पोभूर्णा, सिन्देवाही, नागभीड (जि.चंद्रपूर) येथे वाघ व बिबटयाच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्यांच्या वारसदारांना आर्थिक मदत देण्याबाबत

(४८) * **५१३१ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मूल, पोभूर्णा, सिन्देवाही, नागभीड तालुक्यात (जि.चंद्रपूर) बिबटे व वाघाने हल्ला केल्याने गेल्या पाच वर्षात ४६ नागरीकांचा मृत्यू झाल्याचे दिनांक १७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन संबंधीत कुटूंबाच्या वारसदारांना वन विभागाकडून आर्थिक मदत देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच वणी, मारेगाव आणि झरी तालुक्यात (जि.यवतमाळ) तीन ते चार वाघांच्या दहशतीमुळे माणसे व जनावरे यांच्या चिंतेने शेतकरीही धास्तावला आहे ही बाब दिनांक २८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच भोर ता.जि.नांदेड येथील मुदखेड शिवारात दबा धरुन बसलेल्या बिबटयाने भोसी शिवारात एका जनावरावर हल्ला केल्याने तीन वर्षाच्या वासराचा जागीच मृत्यू झाल्याने परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, हे वाघ व बिबटे पकडण्यासंदर्भात शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुधीर मुनगंटीवार : (१) एप्रिल २०१० ते फेब्रुवारी २०१५ पर्यंत मूल, पोंभूर्णा, सिंदेवाही व नागभिड तालुक्यात बिबट व वाघाच्या हल्ल्यात २३ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे.

(२) शासन निर्णयाच्या तरतूदीनुसार बिबट व वाघाच्या हल्ल्यात मृत झालेल्या व्यक्तीच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(३) यवतमाळ जिल्ह्यातील वणी आणि झरी जामणी तालुक्यात चार वाघांचा वावर आहे. ह्या परिसरात गेल्या २ वर्षात वाघाच्या हल्ल्यात १०३ पाळीव जनावरे व ३ व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) व (६) चंद्रपूर जिल्ह्यात मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या बिबट्यास पिंज-यात जेरबंद करण्यांत आले आहे.

तसेच सन २०१४ मध्ये मानवी जिवितास धोकादायक ठरलेल्या वाघाला पिंजराबंद करण्याचे व बेशुद्धीकरण करुन बंदिस्त करण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्याने व अधिक मनुष्यहानी टाळण्याच्या दृष्टीने मुख्य वन्यजीव रक्षक तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पूर्व परवानगीने मानव जिवीतास धोकादायक ठरलेल्या सदर उपद्रवी वाघास वनविकास महामंडळाचे पश्चिम चांदा वन्यप्रकल्प विभागातील चिचपल्ली परिक्षेत्रातील कक्ष क्र.५१६ डोंगरहळदी पारिसरात दिनांक १९.०८.२०१४ रोजी पोलीस विभागाच्या शूटरद्वारे ठार करण्यांत आले आहे.

वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ चे कलम ११(१) क नुसार अनुसूची १ मधील वन्यप्राणी १) मानवी जिवितास धोकादायक ठरल्यास किंवा २) बरे होण्याचे पलीकडे रोगग्रस्त किंवा अपंग झाल्यास त्याला पकडण्यासाठी परवानगी देता येते. वाघ हा वन्यप्राणी अनुसूची १ मध्ये येतो. यवतमाळ वनवृत्तातील वाघ हा वन्यप्राणी मानवी जिवितास धोकादायक अथवा बरे होण्यापलीकडे रोगग्रस्त झाल्याचे निदर्शनास आले नाही. त्यामुळे त्यास पकडण्यासंदर्भात कार्यवाही करता आली नाही.

नांदेड वन विभागामार्फत बिबट आढळलेल्या परिसरामध्ये पिंजरा लावण्यात आलेला होता. परंतु सदरचे बिबट पिंज-यामध्ये जेरबंद झालेले नाहीत.

मराठवाड्यातील पाणी टंचाई दूर करण्याबाबत

(४९) * ३३२४ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जायकवाडी, विष्णुपुरी, येलदरी, सिध्देश्वर मांजरा व तेरणा आदी प्रकल्पामधील जलसाठा ५० टक्यांपेक्षा कमी झाल्यामुळे ऐन हिवाळ्यातच मराठवाड्यात तीव्र पाणी टंचाई झाल्याचे माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात निर्माण झालेली तीव्र पाणी टंचाईची समस्या निवारण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीष महाजन : (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील जायकवाडी, विष्णुपुरी, येलदरी, सिध्देश्वर मांजरा व तेरणा आदी प्रकल्पामधील दिनांक ०५/०१/२०१५ रोजीचा पाणीसाठा खालील प्रमाणे होता.

अ.क्र.	धरणाचे नांव	पाणीसाठा द.ल.घ.मी.	टक्केवारी
१	विष्णूपुरी	३८	४७
२	येलदरी	२७६	३०
३	सिध्देश्वर	३७	४६
४	जायकवाडी	६४२	३०
५	मांजरा	०	०
६	तेरणा	०	०

(२) जायकवाडी धरणात कमी पाणीसाठा असल्याने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांच्या दिनांक १९/९/२०१४ च्या आदेशानुसार जायकवाडीच्या वरील धरणातून १९२.७६.८७ द.ल.घ.मी. पाणी जायकवाडी साठी सोडण्यात आले.

धरणातून पिण्याच्या पाण्याचे आरक्षण जिल्हाधिकारी यांच्या मागणीनुसार करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील धरणांना भुकंपाचा असलेला धोका

(५०) * ५४६५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १७० जलविद्युत प्रकल्पे, धरणे व पाणीसाठे, उच्च भुकंप प्रवण क्षेत्रात येत असल्याबाबतची माहिती भारतीय मानक संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या अभ्यासात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा उच्च भुकंप प्रवण क्षेत्रातील धरणांच्या सुरक्षिततेसाठी तसेच भविष्यातील दुर्घटना रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गिरीष महाजन : (१) भारतीय मानक संस्थेच्या वतीने तयार करण्यात आलेला अभ्यास शासनाकडे उपलब्ध नाही. महाराष्ट्रात बांधकाम पुर्ण झालेल्या धरणांपैकी उच्च भूकंपप्रवण क्षेत्रातील (झोन IV) मध्ये १६१ धरणे आहेत.
(२) महाराष्ट्र राज्यात जलसंपदा विभागा अंतर्गत महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांचे कडुन वेगवेगळ्या प्रकल्पांजवळ आवश्यकतेनुसार ३५ भूकंप मापक केंद्राची (Seismological Stations) ची उभारणी करण्यात आलेली आहे.

कोयना व वारणा धरणे भूकंप प्रवण क्षेत्रातील झोन IV मध्ये मोडतात. या धरणाच्या परिसरात भूकंप मापन केंद्र उभारण्यात आलेले आहेत. या केंद्रावर प्राप्त झालेली माहितीचे पृथःकरण कार्यकारी अभियंता, भुकंप आधार सामग्री पृथःकरण विभाग, मेरी नाशिक यांचे कडे करण्यात येते. तसेच ३५ भूकंप मापक केंद्रांचे निरिक्षण व माहितीचे पृथःकरण करुन तिमाही अहवाल सर्व संबंधीतांना पाठविण्यात येतात.

रिश्टर स्केल ४ व त्यापेक्षा जास्त तिव्रतेच्या भूकंपानंतर सदर भूकंप प्रवण क्षेत्रात असणा-या धरणांची केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार विशेष तपासणी प्रकलप अधिकारी करतात व त्यांचे अहवाल संबंधित मुख्य अभियंता व धरण सुरक्षितता संघटनेकडे पाठवतात. भूकंपामुळे धरणात काही त्रुटी उद्भवल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही प्रकल्प यंत्रणेकडुन करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

आटपाडी,जि.सांगली येथील तात्कालिन तालुका कृषी अधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

(५१) * **६०१२ श्री.नरेंद्र पाटील, श्री.संदिप बाजोरिया, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आटपाडी (जि.सांगली) येथील तत्कालिन तालुका कृषी अधिकारी,मंडल कृषी अधिकारी आणि सुपरवायझर यांनी सन २०१२ ते २०१४ या कालावधीत उपविभागीय कृषि अधिकारी यांना हाताशी धरुन गतिमान पाणलोट क्षेत्राची कामे निकृष्ट व कागदोपत्री दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आटपाडी तालुक्यात विशेष घटक योजनेअंतर्गत सन २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये मागासवर्गीयांसाठी आलेल्या निधीचा उपयोग कागदोपत्री दाखवून त्यातही बोगस कामे केल्याचे दाखवून लाखो रुपयांचा गैरव्यवहार केला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तेथील नागरिकांनी व शेतक-यांनी वरील संदर्भातील तक्रारी जिल्हा कृषी अधीक्षक, सांगली व विभागीय कृषी संचालक, कोल्हापूर यांच्याकडे सन २०१३-१४, २०१४-१५ मध्ये वा त्यादरम्यान केलेल्या आहेत हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, सदर प्रकरणात वरील अधिका-यांनी एकूण किती रुपयांचा गैरव्यवहार केलेला आहे,

(५) सदर प्रकरणात दोषी असणा-या अधिका-यावर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(६) अद्याप शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्रीमती पंकजा मुंडे : (१), (२) व (३) हे खरे नाही.

तथापि गतिमान पानलोट विकास कार्यक्रमांतर्गत आटपाडी तालुक्यामध्ये कमी प्रमाणात कामे मंजूर केलेली आहेत व झालेली कामे निकृष्ट दर्जाची आहेत अशी तक्रार सदस्या, महिला व बालकल्याण समिती, जि.प. सांगली यांनी जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे केली आहे.

(४) तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय कृषि अधिकारी, विटा यांचे मार्फत चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.